Mrs.K.S.K.College,Beed

Dept.of Marathi

Event report -2020-2021

दि.१५ ऑगस्ट २०२० रोजी स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने मराठी विभागाच्या वतीने स्वातंत्र्यदिन विशेषांक भित्तीपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले.दि.२६ जानेवारी २०२१ रोजी विभागाच्या वतीने प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने भित्तीपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले.दि.१० फेब्रुवारी २०२१ रोजी आकाशवाणी केंद्र बीड आणि मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्‌यमाने कवी-संमेलनाचे आयोजन करण्यात आले.यामध्ये प्राचार्य डॉ.दीपा क्षीरसागर, डॉ.सुरेखा जोशी, डॉ.अनिता शिंदे, डॉ.माया खांदाट,प्रा.जयश्री लामतुरे,डॉ.प्रज्ञा महेशमाळकर, डॉ. राजश्री तावरे, अंजली गवई ,सोनाली शहाणे आदीं कवयित्रींनी सहभाग नोंदविला.आकाशवाणी केंद्राचे निवेदक श्री.गोपाळ ठाकूर यांची या कार्यक्रमाला विशेष उपस्थिती होती.

Head of the Department

मराठी विभागप्रमुख

सौ.के.एस.के.महाविद्यालय,बीड.

# कवींनी सादर केले स्त्रियांचे दुःख, सामाजिकतेवर कविता



के.एस.के.महाविद्यालयातील कविसंमेलन.

**प्रतिनिधी | बीड**

के.एस.के. महाविद्यालयातील मराठी विभाग व आकाशवाणी केंद्र बीड यांच्या संयुक्त विद्यमाने कविसंमेलन आयोजित केले होते. या वेळी आकाशवाणी केंद्राचे गोपाळ ठाकूर यांची विशेष उपस्थिती होती. दरम्यान, विविध कवींनी संमेलनात प्रेम, स्त्रियांचे दुःख, सामाजिक आशयाच्या कविता सादर केल्या. या प्रसंगी प्राचार्य डॉ. दीपा क्षीरसागर यांनी आई गेल्यानंतर मुलीच्या जीवनात कशी पोकळी निर्माण होते ती आपल्या कवितेतून मांडली. प्रसिद्ध कवयित्री डॉ. सुहासिनी इर्लेकर यांच्या दोन हृदयस्पर्शी कविता सादर केल्या. या वेळी अनिता शिंदे, सुरेखा जोशी, माया खांदाट, जयश्री लामतुरे, प्रज्ञा महेशमाळकर, राजश्री तावरे, अंजली गवई, सोनाली शहाणे यांनी आपल्या कविता सादर केल्या. या वेळी मराठी विभागातील डॉ. मधुकर क्षीरसागर व पदव्युत्तर विभाग प्रमुख डॉ. रेखा गुळवेंसह महिला कर्मचारी कविसंमेलनाला उपस्थित होत्या. सूत्रसंचालन डॉ. सुरेखा जोशी व डॉ. अनिता शिंदे यांनी, तर आभार प्रा. बालासाहेब कटारे यांनी मानले.

दै. दिव्य मराठी, बीड
शुक्रवार, दि. १२
फेब्रुवारी २०२१

CS Scanned with CamScanner

दैनिक **लोकाशा** महाराष्ट्राच्या मनाचा नकाशा

बुधवार दि.८ डिसेंबर २०२१ पान ३

# मा.आ. क्षीरसागरांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हास्तरीय निबंध लेखन स्पर्धा संपन्न

बीड, दि.७ (लोकाशा न्युज) : येथील सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयामध्ये मा.मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून जिल्हास्तरीय निबंध लेखन स्पर्धा (वरिष्ठ विभाग) घेण्यात आली. बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांची सद्यस्थिती, बीड जिल्ह्याची सांस्कृतिक परंपरा : शोध आणि बोध आणि ऑनलाईन शिक्षण पध्दतीचे फायदे/तोटे या विषयावर ही स्पर्धा संपन्न झाली. बीड जिल्ह्यातील अनेक नामांकित महाविद्यालयाने या स्पर्धेत सहभाग नोंदवला. बीड, अंबाजोगाई, परळी, केज, वडवणी, पाटोदा आदी ठिकाणावरून अनेक विद्यार्थ्यांनी वरील विषयावर अत्यंत अभ्यासपूर्ण मांडणी केलेले वैचारिक स्वरूपाचे निबंध पाठवून ही स्पर्धा यशस्वी केली. मा.मंत्री जयदत्तजी आण्णांना स्व.केशरकाकूंचा समाजसेवेचा वारसा आहे.राजकारणात असूनही समाजसेवेलाच प्राधान्य ही मा. आण्णांची राजकारणातील भूमिका राहिलेली दिसते. मा.आण्णांच्या जन्म दिवसाचे औचित्य लक्षात घेऊन काही गंभीर आणि समाजाभिमुख विषयावर चिंतन, मनन, लेखन व्हावे या भूमिकेने महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हाभरातील अनेक महाविद्यालयांच्या सक्रिय सहभागामुळे ही स्पर्धा कमालीची यशस्वी झाली.

CS Scanned with CamScanner